सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,तालुका दर्यापुर यांचे कार्यालय,
कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात,अकोट रोड,दर्यापुर
ई-मेल :arcs.amr.daryapur@gmail.com

जाक्र.सनिद /नियमन/शे.दे.गा.व.ई.१/७३सी.ए./ २४२८ /२०१७ दिनांक २८/१२/२०१७

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ क अ अन्वये आदेश

**वाचा-** १) अर्जदार श्री .शेखर देविदास गावंडे व ईतर-१ रा.सांगळुद तालुका दर्यापुर जि.अमरावती यांचा दिनांक २८/१२/२०१६ च्या अर्जानुसार सुधारीत दिनांक १९/०१/२०१७ रोजीचा अर्ज.
२)या कार्यालयाची सुनावणी नोटीस क्रमांक सनिद/नियमन/कलम ७३पात्रता/१३०/२०१७,दि ०८/०२/२०१७

---

ज्याअर्थी, प्राथमिक कृषी सहकारी संस्था मर्या सांगळुद ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार नोंदणीकृत सहकारी संस्था असून संस्थेचा नोंदणी क्रमांक ७०५ असा आहे .अर्जदार श्री. शेखर देविदास गावंडे व कुलदीप जगन्नाथराव गावंडे हे सदर संस्थेचे सभासद आहेत.

ज्याअर्थी, वाचा क्रमांक १ अन्वये अर्जदार सांगळुद सेवा सहकारी संस्थेचे सभासद असलेले श्री .शेखर देविदास गावंडे व ईतर - १ रा. सांगळुद ता. दर्यापुर जि.अमरावती यांनी गैरअर्जदार क्र.१ श्री. अरुण त्र्यबंकराव गावंडे हे सांगळुद सेवा सहकारी संस्था मर्या.र.न. ७०५ या संस्थेचे व्यवस्थापक समिती सदस्य असुन संस्थेच्या दिनांक २२/०४/२०१५ रोजी झालेल्या अविरोध निवडणुकी मध्ये सर्वसाधारण खातेदार कर्जदार या मतदार संघामध्ये समिती सदस्य म्हणुन अविरोध निवडुन आलेले आहे. त्यांनी विविध संस्थेमध्ये नियमावलीचे व कायदयाचे उल्लधन केले असल्यामुळे सांगळुद सेवा सहकारी संस्था मर्या.र.न. ७०५ या संस्थेचे समिती सदस्य राहण्यास अपात्रता धारण करितात म्हणुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७३ एफ.एफ. अंतर्गत अर्जदार यांनी या कार्यालयाकडे अर्ज दाखल केला.

ज्याअर्थी, वरिल प्रकरणात अर्जदाराने दिनांक १८/०१/२०१७ ला मुळ दाखल करण्यात आलेल्या प्रकरणात कलम ७३ एफ.एफ. ऐवजी कलम ७३ कअ अशी दुरुस्ती साठी अर्ज दाखल केला. सदर च्या दुरुस्ती अर्जावर गैरअर्जदाराचे म्हणणे ऐकुन घेण्यात आले. अर्जदाराने दुरुस्तीसाठी केलेला अर्ज हा केवळ तांत्रिक बाबी संदर्भात असल्याने मुळ अर्जाचे स्वरुप बदलत नसल्याने तो अर्ज मंजुर करण्यात आला.

ज्याअर्थी, दिनांक २३/१२/२०१६ ला दाखल केलेल्या वरिल प्रकरणात वादी व प्रतिवादी यांना नोटीसेस निर्गमीत करुन सुनावण्या घेण्यात आल्या. या कार्यालयाने वरिल प्रकरणी ठेवलेल्या रोजनाम्या नुसार प्रकरणात खालील तारखा नेमुण देण्यात आल्या होत्या.२७/०२/२०१७, ०६/०३/२०१७, १७/०३/२०१७, १७/०४/२०१७, २४/०४/२०१७, १५/०६/२०१७,१८/०७/२०१७,२४/०७/२०१७,०७/०८/२०१७,०३/११/२०१७ व २०/११/२०१७ या नुसार अर्जदार व गैरअर्जदार यांना प्रकरणात कागदपत्रे/ दस्ताऐवज सादर करण्यास पुरेशी संधी देवुन त्यानंतर सदर प्रकरण निर्णयास्तव बंद करण्यात आले.

ज्याअर्थी, अर्जदार / तक्रारकर्ते श्री. शेखर देविदास गावंडे व ईतर-१ यांनी त्यांचे युक्तीवादा दरम्यान असे म्हणने मांडले की, गैरअर्जदार क्र-१ श्री.अरुण त्र्यंबकराव गावंडे हे सांगळुद सेवा सहकारी संस्थेचे सन-२०१५ साली झालेल्या सर्वसाधारण खातेदार कर्जदार या मतदार संघातुन अविरोध्द निवडुन आलेले समिती सदस्य आहे. ही बाब स्पष्ट आहे. यात अर्जदार व गैरअर्जदार यांचे मध्ये दुम्मत नाही.तथापी अर्जदाराचे म्हणणे असे आहे की, श्री.अरुण त्र्यबंकराव गावंडे गैरअर्जदार क्र-१ हे सांगळुद सेवा सहकारी संस्थेचे व्यवस्थापक समिती सदस्य म्हणुन राहण्यास अपात्र आहे.कारण ते श्री.गणेश दालमिल या सहकारी संस्थेचे गेल्या १५ वर्षा पासुन अध्यक्ष आहे.या संस्थेचे एकुण १४२ सभासद आहे. या सभासदा कडुन शेअर्स ची रक्कम रुपये १७९०००/- जमा केलेली असुन त्याच्या पावत्या सुध्दा सदस्यांना देण्यात आल्या. परंतु रक्कम संस्थेचे निधीत भरणा केलेली नाही.आज तारखेस सुध्दा घेणे दिसते.सन २०००-२००१ या अंकेक्षण अहवालात गैरअर्जदार यांचे कडुन रक्कम घेणे असल्याचे नमुद आहे. तसा आक्षेप आहे. सन-२०१५ चे लेखापरिक्षण अहवालात लेखापरीक्षकांनी स्पष्ट पणे नमुदपणे केले आहे की,दोष दुरुस्ती अहवाल सादर केलेला नसुन दोष कायम आहे व या बाबीवरुन स्पष्ट आहे की त्यांनी सदरची रक्कम संस्थेमध्ये आजपर्यंत भरणा केलेला नाही. सदर अंकेक्षण अहवालाची प्रत प्रकरणांत दाखल केलेली आहे.

ज्याअर्थी, गैरअर्जदार क्र.१ श्री.अरुण त्र्यंबकराव गावंडे हे बाबासाहेब सांगळुदकर सहभागिदारी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या.दर्यापुर र.नं.२४३ ता.दर्यापुर, जि.अमरावती या संस्थेचे सभासद आहेत . तसेच सन जुन २०१६ मध्ये झालेल्या सदर संस्थेच्या निवडणुकी मध्ये गैरअर्जदार श्री.अरुण त्र्यबंकराव गावंडे यांनी आपले नामाकंन पत्र दाखल केले होते.त्या नामाकंन पत्रावर श्री.दामोदर शा. पांडे यांनी आक्षेप घेतला असता निवडणुक निर्णय अधिकारी यांनी आक्षेप खारीज केल्यामुळे व्यथीत झाल्याने सभासद श्री.दामोदर शा. पांडे यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपिठ नागपुर येथे याचिका क्रमांक ३४४६/२०१६ ही दाखल केली होती. त्या याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने न्यायनिर्णय दिलेला असुन त्याअन्वये त्यांना संस्थेचे समिती सदस्य म्हणून राहण्यास अपात्र असल्यामुळे त्यांचा उमेदवारी अर्ज रद्य करण्यात आला होता. सदरचा निर्णय अजुनपर्यंत अबाधित आहे. त्याची प्रत प्रकरणांत दाखल केलेली आहे. तसेच अर्जदारांनी कृषी उत्पन्न बाजार समिती दर्यापुर च्या बाबतीत गैरअर्जदाराच्या संदर्भात दाखल बाबी वरुन सदर प्रकरण हे न्यायप्रविष्ठ असल्याने व कृषी उत्पन्न बाजार समिती ही सहकारी संस्था नसल्या कारणाने येथे ही बाब विचारात घेण्याची या कार्यालयास आवश्यकता वाटत नाही.

ज्याअर्थी, गैरअर्जदार क्र.१ श्री.अरुण त्र्यंबकराव गावंडे यांनी त्यांचे लेखी जबाबात व युक्तीवादात असे म्हणने माडले की, ते विविध सहकारी संस्थामध्ये संचालक तथा सदस्य आहे. श्री.गणेश दालमिल सहकारी संस्था, दर्यापुर र.नं.४५१ मध्ये सदस्य आहेत हे म्हणणे बरोबर आहे. परंतु या संस्थेत अध्यक्ष म्हणुन कारभार चालवितात व १९९३ पासुन आजतागायत अध्यक्ष म्हणुन त्यांची नियुक्ती आहे हे म्हणणे खोटे व नाकबुल केले आहे. तर संस्थेचे १४२ सभासदा कडुन रुपये १७९०००/- ही शेअर्स ची रक्कम जमा करण्यात

श्री.अरुण त्र्यंबकराव गावंडे यांनी असेही म्हणने मांडले की, बाबासाहेब सांगळुदकर सहभागीदारी गृहनिर्माण संस्थेचे सभासद आहेत व जुन २०१६ मध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये त्यांचे विरुध्द अर्ज आला होता व त्यांना मतदार यादीतुन काही तांत्रिक कारणांनी वगळण्यात आले हे म्हणणे बरोबर आहे. परंतु गैरअर्जदार क्र.१ हे विविध कारणाकरिता बाबासाहेब सांगळुदकर सहभागीदारी गृहनिर्माण सहकारी संस्था या संस्थेचे सदस्य राहण्यास अपात्र असल्यामुळे त्यांचा उमेदवारी अर्ज रद्द करण्यात आला हे म्हणणे खोटे आहे.

ज्याअर्थी, दाखल प्रकरण, दाखल दस्तऐवज, लेखी जबाब व संबंधीतांचा युक्तीवाद विचारात घेता असे निदर्शनास येते की, गैरअर्जदार क्र.१ श्री.अरुण त्र्यंबकराव गावंडे यांनी श्री गणेश दालमील संदर्भात त्यांचेवर करण्यात आलेला आरोप हा नाकबुल असल्याचे प्रतिपादन केले तथापि, त्यांनी त्यापृष्ठ्यर्थ कोणतेही दस्तऐवज प्रकरणांत दाखल केलेले नाही. त्याचप्रमाणे, गैरअर्जदार क्र.१ यांचे युक्तीवादानुसार, ते विविध कारणाकरिता बाबासाहेब सांगळुदकर सहभागीदारी गृहनिर्माण सहकारी संस्था या संस्थेचे सदस्य राहण्यास अपात्र असल्यामुळे त्यांचा उमेदवारी अर्ज रद्द करण्यात आला हे म्हणणे खोटे असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले, परंतु, यासंदर्भात त्यांनी कोणतेही दस्तऐवज व पुरावा प्रकरणांत दाखल केलेला नाही.

ज्याअर्थी, गैरअर्जदार क्र.१ श्री.अरुण त्र्यंबकराव गावंडे यांनी बाबासाहेब सांगळुदकर सहभागीदारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. दर्यापूर या संस्थेच्या सन २०१६ चे व्यवस्थापक समिती सदस्य पदाकरिता उमदेवारी अर्ज दाखल केला असता, त्यासंदर्भात मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथे दाखल याचिका क्रमांक ३४४६/२०१६ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.२०.७.२०१६ रोजी दिलेल्या न्यायनिर्वाळयानुसार, श्री.अरुण त्र्यंबकराव गावंडे यांना सदर संस्थेचे सदस्य म्हणून निवडणून येण्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३कअ(१) (i) नुसार अपात्रता धारण केलेली आहे व त्यामुळे त्यांचा उमेदवारी अर्ज नामंजूर करण्यात आलेला होता असे स्पष्ट होते.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३कअ नुसार समितीची आणि तिच्या सदस्यांची निरर्हता दिलेली असुन, कलम ७३कअ (१) (चार) मध्ये नमुद केल्यानुसार, जर ती व्यक्ती या अधिनियमान्वये किंवा त्या खाली केलेल्या नियमान्वये कोणत्याही प्रकारे अनर्ह ठरली असेल तर, ती व्यक्ती संस्थेचा समिती सदस्य म्हणून नेमणूक होण्यास, निवडून येण्यास, स्वीकृत केली जाण्यास किंवा सदस्य म्हणून राहण्यास पात्र असणार नाही, अशी तरतुद आहे. आणि गैरअर्जदार क्र.१ यांना मा. उच्च न्यायालयाचे दि.२०.७.२०१६ चे आदेशानुसार, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३कअ (१) (i) नुसार अपात्रता धारण केलेली असल्याचे स्पष्ट केलेले आहे.

त्याअर्थी, गैरअर्जदार क्र.१ श्री.अरुण त्र्यंबकराव गावंडे यांनी सांगळूद सेवा सहकारी संस्था मर्या. या संस्थेचे समिती सदस्य म्हणून राहण्यास पात्र असणार नाही असे माझे स्पष्ट मत झाल्यावरुन प्रस्तुत प्रकरणांत खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## * आदेश *

महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील आदेश क्रमांक-सिएसएल/१४९३/११३२/सीआर-४७/१५-सी दिनांक ०७/०८/१९९३ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, मी आर .पी . सुने, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दर्यापुर ता .दर्यापुर, जि .अमरावती असा आदेश देतो की, श्री. अरुण त्र्यंबकराव गांवडे व्यवस्थापक समिती सदस्य सांगळुद सेवा सहकारी संस्था मर्या. हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चें कलम ७३कअ नुसार सदर संस्थेचे समिती सदस्य म्हणून अपात्रता धारण करीत असल्याचे घोषीत करण्यात येत असुन ते या आदेशाचे दिनांका पासून व्यवस्थापक समितीचा सदस्य असण्याचे बंद होईल

सदर आदेश आज दिनांक- २८/ १२/२०१७ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला आहे .

(आर .पी .सुने)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,दर्यापुर

प्रत :-

१) श्री.अरुण त्र्यंबकराव गांवडे,व्यवस्थापक समिती सदस्य सेवा सहकारी संस्था,मर्या .सांगळुद, र .नं .७०५ यांना माहितीकरिता

२) अर्जदार श्री.शेखर देवीदास गांवडे व इतर-१, रा .सांगळुद, ता .दर्यापुर जि .अमरावती यांना त्याचे दिनांक २८/१२/२०१६ च्या व सुधारीत दिनांक.१९/०१/२०१७ चे अर्जानुसार माहितीकरिता रवाना

३) सचिव, सेवा सहकारी संस्था मर्या .सांगळुद, र .नं .७०५ यांना सुचित करण्यात येते की, सदर आदेशाचे अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा .

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,दर्यापुर